# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
# दिनांक 20/01/2020 (सोमवार)
# (सकाळ)

---

## घरफोडी

पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत 01 कि.मी अंतरावर मौजा कावरापेठ उमरेड येथे दिनांक 18/01/2020 ते दिनांक 19/01/2020 चे 20:30 वा. ते 05:30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– मंगेश यशवंत जुनघरे, वय 32 वर्ष, रा. कावरापेठ, उमरेड यांचे दुमजली घर असुन घराचे दार बंद करून फिर्यादींच्या पत्नी या घराच्या पहील्या मजल्यावर झोपल्या होत्या. फिर्यादी हे मालकीच्या ट्रॅकवर पवनी, जि. भंडारा येथे गेले होते. दरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादींच्या राहत्या घराचे समोरील दाराचा कुलूप तोडून आत प्रवेश केला. यानंतर आरोपीने घरात कपाटात व स्वयंपाक खोलीत ठेवलेले नगदी 4,60,000/–रू. व सोन्याचे दागिने कि. 2,00,000/–रू. असा एकुण किंमती 6,60,000/–रू. चा मुद्येमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. देवलापार येथे आरोपीविरुध्द कलम 457, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार विनायक नागुलवार हे करीत आहे.

## दुखापत

पो.स्टे. बेला :– अंतर्गत 22 कि. मी. अंतरावर मौजा सिंसी वार्ड क्र. 04 येथे दिनांक 18/01/2020 चे 19:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– गं.भा. शांताबाई जयराम मेहरकुरे, वय 77 वर्ष, रा. सिंसी, तह. उमरेड, जि. नागपूर यांच्या अंगणात आरोपी नामे– रहिसा अयुब अगवान, वय 35 वर्ष रा. वार्ड नंबर –4, सिंसी, तह. उमरेड, जि. नागपूर यांच्या कोंबडया आल्याने फिर्यादींनी कोंबडयांना हाकलले. या कारणावरून आरोपीने फिर्यादीस सोबत भांडण केले. यानंतर आरोपीने फिर्यादीस हातबुक्कीने व काठीने मारहाण करून जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. बेला येथे आरोपीविरुध्द कलम 324 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. यातील आरोपीला अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार गणेश राय 9764382179 हे करीत आहे.

# विनयभंग

पो.स्टे. कळमेश्वर :– 1 वर्षा पासुन ते दिनांक 18/01/2020 चे 07:00 वा. ते 07:30 वा. दरम्यान 14 वर्षीय अल्पवयीन फिर्यादी/पीडित ही शाळेत जात असतांना आरोपी नामे– वैभव सुधाकर ठाकरे, वय 22 वर्ष, रा. आष्टी, पो. कळंबी, ता. कळमेश्वर याने दुचाकी गाडीने तिचा नेहमी पाठलाग करीत होता. आरोपीने पीडितेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा वारंवार विनयभंग करून मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम 354, 354(ड), 506 भादंवी. सहकलम सहकलम 12 बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास मसपोनि अश्विनी बावचे या करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर